## प्रेस नोट दिनांक २०/०३/२०१९

## बॅटरी बॉक्स व स्टील बेल्ट पार्सलची चोरी करणारे आरोपींना समर्थ पोलीसांनी रंगेहाथ पकडले

## समर्थ पोलीस स्टेशन, पुणे

दिनांक १७-३-२०१९ रोजी समर्थ पोलीस ठाण्याचे कार्यक्षेत्रात समर्थ पोलीस स्टेशन तपासपथकाचे कर्मचारी पोशि.बाळासोब भांगले, पोशि.घनवट, पो.हवा.काळे, बीट मार्शलचे पोलीस शिपाई,हेमंत पेरणे, पोलीस शिपाई, उमेश भोर असे पेट्रोलिंग करीत असताना १६/३० वा.चे सुमारास नेहरु रोडवर शाहु उद्यान समोरुन एका ज्युपिटर दुचाकी गाडी क्र.एम.एच.१२ एन.क्यु. २९३७ वरुन दोन इसम गाडीचे फुटरेसवर दोन बॉक्स संशयितरित्या घेऊन जाताना दिसले. पोलीस कर्मचारी यांना त्यांचा संशय आल्याने,त्यांनी त्यांचा पाठलाग करुन त्या दोघांना भाजी मंडई बरके आळी रोड,सोमवार पेठ,पुणे येथे पकडले. त्यांचे नाव १.राहूल उर्फ पप्या संजय ससाणे,वय - २१ वर्षे,रा.भिमनगर,२९९,मंगळवार पेठ,पुणे असे असुन,तो व त्याचा साथीदार अल्पवयीन मुलगा यांचेकडे लायसन्स व गाडीच्या कागदपत्रांबाबत विचारसुस केली. तसेच गाडीवर असलेल्या बॉक्स बाबत विचारपुस केली असता ते उडवा-उडवीची उत्तरे देवू लागली. त्यामळे पोहवा.काळे यांनी त्यांना सीआरपीसी ४१(१)(ड) अन्वये ताब्यात घेतले. त्यांना विश्वासात घेवुन त्यांचेकडे अधिक चौकशी केली असता,सदर दोन्ही मुलांनी महाबली कुरियर माळी महाराज मठा जवळ,सोमवार पेठ, पुणे येथे पहाटेचे वेळी कुरियरची पार्सले लोडींग करण्याचे काम चालू असताना,त्यांची नजर चकवून तेथून ३५०००/- किच्या दोन बॅटरी बॅक्स व स्टिकर बेल्टच्या पार्सलची चोरी केलेली आहे अशी माहिती दिली. संबंधित कुरियर सर्वीस चे मालकास पार्सल चोरीस गेलेले आहेत याची माहिती देखील नव्हती. पोलीस चौकशीस त्याचेकडे पोहाचले तेव्हा त्याला याची माहिती झाली. अशा रितीने रु.३५०००/- चा चोरीस गेलेला माल २४ तासाचे आत पोलीसांनी हस्तगत केलेला आहे. या चोरीचे घटनेबाबत कुरियर सर्वीसचे श्री.विशा विष्णू भागवत,रा.विनायकनगर,नवी सांगवी,पुणे यांनी दिलेले तक्रारीनुसार समर्थ पोस्टे पुणे येथे गुन्हा रजि.नं.७२/२०१९,भादविक ३७९,३४ प्रमाणे गुन्हा नोंदविण्यात आलेला असून,त्यामध्ये राहूल उर्फ पप्प्या संजय ससाणे,वय-२१ रा.२९९,मंगळवार पेठ,पुणे यास पो.हवा.काळे यांनी सदर गुन्हयात अटक करुन त्याचेकडून चोरीस गेलेला ३५०००/- रूपये किंमतीचा ऐवज हस्तगत केलेला आहे. तसेच त्याचा साथीदार अल्पवयीन मुलगा याचेकडे चौकशी करण्यात येत आहे.